# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः13.11.2024** **वारःबुधवार**

---

१. राज्यात विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी; राजकीय पक्षांच्या केंद्रीय नेतृत्वाच्या प्रचार सभांचा धडाका

२. महायुती हाच राज्याच्या विकासाचा पर्याय असल्याचं भाजपा नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

३. सत्तेत आल्यास जातनिहाय जनगणना करण्याचं आणि आरक्षणावरची ५० टक्क्यांची मर्यादा हटवण्याचं काँग्रेस नेते राहुल गांधी यांचं आश्वासन

आणि

४. पुण्यात म्हाळुंगे बालेवाडी इथल्या क्रीडा संकुलात राष्ट्रीय पॅरा नेमबाजी स्पर्धेला सुरूवात

**<u>प्रचार सत्ताधारी</u>**

विधानसभा निवडणुकीच्या प्रचारामुळे ऐन थंडीच्या दिवसांत राज्यातलं राजकीय वातावरण तापलं आहे. विविध राजकीय पक्षांच्या केंद्रिय नेत्यांच्या प्रचारसभा राज्यात होत आहेत. एकमेकांवर आरोप-प्रत्यारोपांचा मारा सुरू आहे. अन्य काही राज्यांचे मुख्यमंत्री, मंत्रीदेखील आपापल्या पक्षाच्या उमेदवारांचा प्रचार करण्यासाठी मैदानात उतरले आहेत.

भाजपा नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची काल पुण्यात प्रचारसभा झाली. या सभेत त्यांनी केंद्रातल्या आणि राज्यातल्या सरकारच्या लोककल्याणकारी योजनांचा लेखाजोखा मांडला. काँग्रेसनं कलम ३७०द्वारे जम्मू-काश्मीर आणि राज्यघटना यांच्यात भिंत निर्माण केली आणि त्यामुळे खोऱ्यात दहशतवादाला पाठिंबा मिळाला असा आरोप

त्यांनी केला. संपूर्ण देशात संविधानाची अंमलबजावणी का झाली नाही, याचं उत्तर कॉंग्रेसनं जनतेला द्यावं असं ते म्हणाले.

राज्यातल्या महायुती सरकारने महाराष्ट्राच्या विकासाची गती अभूतपूर्व ठेवली आहे. देशात मोठ्या प्रमाणात परकीय गुंतवणूक झाली असून त्यात महाराष्ट्र आघाडीवर आहे. महायुती हाच राज्याच्या विकासाचा पर्याय आहे, असंही मोदी म्हणाले, आपल्या भाषणात बोलताना ते पुढ म्हणाले --

महाविकास आघाडी ही दिशा आणि धोरण नसलेली गाडी असल्याची टीका मोदी यांनी सोलापूर इथल्या प्रचारसभेत केली. देशातल्या आरक्षणाला काँग्रेसकडूनच धोका असल्याचं ते म्हणाले. भाजपाच्या अनेक लोकोपयोगी योजनांचा सर्वसामान्य लोकांना लाभ झाला असं सांगून इथेनॉलबाबतच्या धोरणामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना आतापर्यंत ८० हजार कोटी रुपयांचा लाभ झाल्याची माहिती त्यांनी दिली.

भाजपाचा जाहीरनामा हे विकासाचं हमीपत्र आहे, गेल्या अडीच वर्षात महाराष्ट्राच्या विकासकामांचा वेग वाढला आहे असं मोदी चिमूर इथल्या प्रचारसभेत म्हणाले.

भाजपचे वरिष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीही काल मुंबईत दोन प्रचारसभा घेत विरोधकांवर हल्लाबोल केला. या निवडणुकीत महाराष्ट्रात महाविकास आघाडीचा सुपडा साफ होणार असल्याचा दावा शहा यांनी केला.

मुंबई ठाण्यासह संपूर्ण कोकणात महायुतीला ६० पेक्षा जास्त जागा मिळतील असा विश्वास भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यात कणकवली इथं व्यक्त केला. यावेळी त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली.

शिवसेना नेते आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची वाशीम जिल्ह्यात रिसोड इथं प्रचारसभा झाली. राज्य सरकारनं गेल्या अडीच वर्षांमध्ये महिलांना आणि शेतकऱ्यांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी विविध योजना राबवल्या असं शिंदे म्हणाले. महायुतीने सुरू केलेल्या योजना बंद पाडण्याचा प्रयत्न महाविकासआघाडीनं केल्याची टीका त्यांनी केली.

पालघर जिल्ह्याला महायुती सरकारनं नावारुपाला आणलं असं सांगून वाढवण बंदर हे आशिया खंडातलं सर्वात मोठं बंदर या जिल्ह्यात आम्ही आणलं असं भाजपा नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. या बंदराच्या

माध्यमातून 10 लाख रोजगार निर्मिती होईल असं त्यांनी पालघर जिल्ह्यात डहाणू इथं आयोजित प्रचारसभेत सांगितलं.

तर पेण इथल्या प्रचारसभेत फडणवीस यांनी शेतकऱ्यांना मोफत वीज, कर्जमाफी देण्याचं आश्वासन दिलं.

महाराष्ट्रानं अनेक महापुरुष या देशाला दिले. या महापुरुषांनी आपल्या नेतृत्वाने देशाला प्रेरणा दिली असं उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी अकोला इथल्या प्रचारसभेत सांगितल . भाजपाच्या कार्यकाळात नवनवीन योजना अमलात येत असून देश प्रगतीपथावर वाटचाल करत आहे असं योगी आदित्यनाथ यांनी सांगितलं.

पुण्याचं बीज पेरलं तर आशीर्वादाचंच पीक उगवतं असं म्हणत केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांची माहिती भाजपा नेत्या स्मृती इराणी यांनी धुळे जिल्ह्यात शिरपूर इथल्या प्रचारसभेत दिली.

**<u>प्रचार विरोधी पक्ष</u>**

विरोधी पक्षांच्या नेत्यांनीही काल राज्यात ठिकठिकाणी जोरदार प्रचार सभा घेत सत्ताधारी पक्षांवर कडाडून टीका केली.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी नाशिक जिल्ह्यात कळवण, दिंडोरी आणि निफाड इथं प्रचारसभा घेतल्या. ज्यांच्या हाती सत्ता आहे त्यांचे शेतकऱ्यांकडे लक्ष नाही. शेतकरी कर्जबाजारी होतात, त्यांना कर्जमाफी मिळत नाही; मात्र १६ उद्योगपतींचं १४ हजार कोटी रुपयांचं कर्ज माफ करण्यात आलं अशी टीका पवार यांनी केली.

काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी गोंदिया इथं प्रचारसभा घेतली. भाजपा सरकार सोयाबीन आणि कापसाला योग्य हमीभाव देत नसल्याची टीका त्यांनी केली. जातनिहाय जनगणनेचं आणि आरक्षणावरची ५० टक्क्यांची मर्यादा हटवण्याचं आश्वासन त्यांनी पुन्हा एकदा दिलं.  ते म्हणाले,

राज्यातील महायुती सरकारच्या काळात महिलांवरील अत्याचारात वाढ झाल्याची टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांनी गडचिरोली जिल्ह्यात आलापल्ली इथं प्रचारसभेत बोलताना केली.

महाविकास आघाडी सत्तेत आल्यावर जीवनावश्यक वस्तूंचे भाव स्थिर ठेवू असं आश्वासन माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी लातूर जिल्ह्यात औसा इथल्या प्रचारसभेत दिलं.

काँग्रेस महाविकास आघाडीची सत्ता आल्यास शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसह शेतकरीहिताचे निर्णय घेऊ, असं आश्वासन काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी अकोट इथल्या प्रचार सभेत दिलं.

**<u>मतदान जनजागृती</u>**

विधानसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी प्रशासन स्वीप अंतर्गत विविध उपक्रम राबवत आहे. याअंतर्गत काल सांगली शहरात आणि सातारा जिल्ह्यात महाबळेश्वर इथं सायकल आणि दुचाकी फेरी आयोजित करण्यात आली होती. यामध्ये शासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांसह नागरिक सहभागी झाले होते.

धुळे जिल्ह्यात शिरपूर नगरपालिकेनं रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यासह मानवी साखळीद्वारे मतदान जनजागृती केली. तसंच घरोघरी जाऊन मतदारांना मतदानाचं महत्त्व सांगितलं जात आहे.

कोल्हापूरमध्ये विविध शासकीय तसंच निम शासकीय कार्यालयांतील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी मतदानाची प्रतिज्ञा घेतली. जिल्ह्यातील मतदारांनी इव्होटरप्लेजकोल्हापूर या संकेतस्थळाला भेट देऊन मतदान करण्याची इ प्रतिज्ञा घ्यावी असं आवाहन यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी केलं.

नांदेड शहरात मानवी साखळी तयार करुन मतदान जनजागृती करण्यात आली.

नंदूरबार शहरात मतदान जनजागृतीसाठी विविध चार गटांत मॅरेथॉन आणि वॉकेथॉन स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत प्रशासकीय अधिकाऱ्यांसह शाळांमधले शिक्षक आणि विद्यार्थी सहभागी झाले होते.

**टपाली मतदान**

रत्नागिरीत काल विधानसभा निवडणुकीसाठी टपाली मतदान पार पडलं. पोलिस आणि मतदान केंद्रावर नियुक्त अधिकारी, कर्मचाऱ्यांनी शहरातल्या मतदान केंद्रावर मतदानाचा हक्क बजावला.

**संत नामदेव जयंती**

संत नामदेवांची जयंती काल हिंगोली जिल्ह्यातल्या नर्सी या नामदेवांच्या जन्मगावी मोठ्या उत्साहात साजरी झाली. पहाटे पाच वाजता ५ हजार १ पणत्या लावून दीपोत्सव साजरा करण्यात आला. त्यानंतर दिवसभरात महापूजा, अभिषेक, आरती, भजन कीर्तन, प्रवचन, आदी धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. कार्तिकी एकादशी हा संत नामदेवांचा तिथीनुसार जन्मदिवस आहे.

**कारवाई**

रत्नागिरी जिल्ह्यात नाखरे गावांत बेकायदा वास्तव्यास असलेल्या १३ बांग्लादेशी नागरिकांना काल रत्नागिरी पोलिस दलाच्या दहशतवादविरोधी शाखेनं ताब्यात घेतलं. त्यांच्यावर पूर्णगड सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

**नेमबाजी**

पुण्यातल्या म्हाळुंगे बालेवाडी इथल्या क्रीडा संकुलात कालपासून राष्ट्रीय पॅरा नेमबाजी स्पर्धा सुरू झाली. या स्पर्धेचं उद्घाटन माजी ऑलिम्पियन मुरलीकांत पेटकर आणि द्रोणाचार्य पुरस्कार विजेते जयप्रकाश नौटीयाल यांच्या हस्ते झालं. स्पर्धेच्या मुख्य फेऱ्यांना आज दुपारी सुरुवात होणार असून यामध्ये पॅरिस पॅरा ऑलिंपिक सुवर्णपदक विजेती अवनी लेकरा हिचा दहा मीटर एअर रायफल आणि दहा मीटर मिश्र एअर रायफल या प्रकारातील खेळ पाहायला मिळणार आहे. १६ नोव्हेंबरपर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत देशभरातील पाचशे नेमबाज

सहभागी झाले आहेत.

## हॉकी

महिलांच्या आशियाई अजिंक्यपद हॉकी स्पर्धेत काल भारताच्या संघानं तीन वेळा विजेतेपद मिळवणाऱ्या दक्षिण कोरियाच्या संघावर ३-२ असा विजय मिळवला. दीपिका सेहरावत हिनं पेनल्टी स्ट्रोकवर निर्णायक गोल करत भारताला विजय मिळवून दिला.

## हवामान

राज्याच्या विविध भागात थंडी जाणवू लागली आहे. सर्वात कमी किमान तापमान काल नाशिक जिल्ह्यात निफाड इथं १२ अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं. नाशिक शहरातही गेले तीन दिवस तापमानाचा पारा घसरत आहे.

आज कोकणात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. उर्वरित राज्यात हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**